**महाराष्ट्र शासन**
**सहसंचालक, उच्च शिक्षण, पुणे विभाग,**
**१७, डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे-१**
**Web-www.jdhepune.in** **E-mail:jdhepune@gmail.com**
फोन नं. ०२०-२६१२७८३३, २६०५१६३२, फॅक्स नं. ०२०-२६१२७८३३

जा.क्र.ससं/उशि/पुवि/निवडणुक/२०२५/ई२३१७२३१/1976 दि. १४-१०-२०२५

प्रति,

१. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.
२. कुलसचिव, सर्व अकृर्षि अभिमत व खाजगी विद्यापीठे/संस्था, पुणे.
३. प्राचार्य /प्राचार्य, अशासकीय अनुदानित/विनाअनुदानित/कायम विनाअनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, शिक्षणशास्त्र, समाजकार्य, व शारिरीक शिक्षणशास्त्र महाविद्यालये, **पुणे जिल्हा.**

**विषय:-दिनांक ०१-११-२०२५ या अर्हता दिनांकावर आधारित पुणे विभाग पदवीधर व शिक्षक विधानपरिषद मतदारसंघाच्या मतदारयाद्या नव्याने तयार करणेबाबत. (बैठक दिनांक १६-१०-२०२५ रोजी सकाळी १०.१५ वाजता न चुकता उपस्थित राहणेबाबत)**

संदर्भः मा. मतदार नोंदणी अधिकारी, पुणे विभाग पदवीधर व शिक्षक मतदार संघ, तथा विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांचेकडील पत्र क्र. सा. प्र.४/निवडणूक/कावि-७७२/२०२५, दि. १०-१०-२०२५

उपरोक्त संदर्भिय विषयाबाबत मा. मतदार नोंदणी अधिकारी, पुणे विभाग पदवीधर व शिक्षक मतदार संघ, तथा विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांचेकडील दि. १०-१०-२०२५ च्या पत्राचे कृपया अवलोकन करावे.

या पत्राच्या अनुषंगाने मा. मुख्य निवडणूक अधिकारी यांचे कडील पत्र क्रमांक ईएलआर-२०२५/प्र. क्र.८७/निवडणूक-६ दि.१२-०९-२०२५ अन्वये दिनांक ०१-११-२०२५ या अर्हता दिनांकावर आधारीत औरंगाबाद, पुणे व नागपूर विभागातील पदवीधर आणि अमरावती व पुणे विभागातील शिक्षक विधानपरिषद मतदारसंघासाठी नव्याने मतदारयाद्या तयार करण्याचा कार्यक्रम सोबतच्या पत्रानुसार प्रमाणे घोषीत केला आहे. (प्रत संलग्न)

सदर कार्यक्रमाचे अनुषंगाने मा. भारत निवडणूक आयोग व मा. मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांनी दिलेल्या निर्देशांबाबत अवगत करणेसाठी मा. मतदार नोंदणी अधिकारी, पूणे विभाग पदवीधर व शिक्षक मतदार संघ तथा विभागीय आयुक्त ,पुणे विभाग, पुणे यांचे आध्यक्षतेखाली दिनांक १६-१०-२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता झुंबर हॉल, विधानभवन, पुणे येथे बैठक आयोजीत करणेत आलेली आहे. **सदर बैठकीस सहसंचालक (उच्च शिक्षण), पुणे विभाग, पुणे समक्ष उपस्थित राहणार आहेत.**

तसेच सदर बैठकीस विभागातील **सर्व पुणे शहरातील महाविद्यालयाचे शैक्षणिक संस्थांचे प्राचार्य यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात व पुणे ग्रामिण महाविद्यालयाचे शैक्षणिक संस्थांचे प्राचार्य यांनी त्यांच्या तालुक्यातील तहसिल कार्यालयात समक्ष व्ही.सी. द्वारे बैठकीला उपस्थित रहावे.** बैठकीच्या ठिकाणाबाबत संबंधीत तालुक्याचे उपविभागीय अधिकारी / तहसिलदार यांचेशी संपर्क साधणेत यावा.

बैठकीसाठी सर्व निमंत्रित केलेल्या निमंत्रितांनी बैठकीच्या ठिकाणी **दिनांक १६-१०-२०२५ रोजी सकाळी १०.१५ वाजता न चुकता उपस्थित** राहणेचे असून, बैठक सुरु होणेपुर्वीच हजेरीचा अहवाल सर्व जिल्ह्यांच्या उपजिल्हा निवडणूक अधिकारी यांचेमार्फत विभागीय आयुक्त कार्यालयास सादर करणेत येणार आहे.

सदरची बैठक ही पदवीधर व शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी नव्याने मतदार नोंदणी करणेबाबतची महत्वाची बैठक असून सदर बैठकीस अनुपस्थित राहिल्यास निवडणूक / मतदार नोंदणी अधिनियमातील तरतुदीनुसार संबंधीतांविरुध्द कारवाई करणेत येईल याची नोंद घेणेत यावी असे नमूद केले आहे. तसेच सोबतच्या पत्राप्रमाणे योग्य ती कार्यवाही करावी.

**सोबत :** संदर्भिय पत्र.

(डॉ. अशोक उबाळे)
सहसंचालक (उच्च शिक्षण)
पुणे विभाग, पुणे

प्रत : मा. मतदार नोंदणी अधिकारी, पुणे विभाग पदवीधर व शिक्षक मतदार संघ, तथा विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, (सामान्य प्रशासन विभाग), विधान भवन, पुणे-१

विभागीय आयुक्त कार्यालय

(सामान्य प्रशासन विभाग) विधान भवन, पुणे-१

ई मेल- gb.divcompune@gmail.com

दुरध्वनी क्र. ०२०-२६३६१०६८


क्र.सा.प्र.४/निवडणूक/कावि-[illegible]/२०२५

**निवडणूक तात्काळ**

दिनांक- १०.१०.२०२५

प्रति,

डॉ अशोक उबाळे (9423124881)

सहसंचालक उच्च शिक्षण, पुणे विभाग

विषय : दिनांक ०१/११/२०२५ या अर्हता दिनांकावर आधारित पुणे विभाग पदवीधर व शिक्षक विधानपरिषद मतदारसंघाच्या मतदार याद्या नव्याने तयार करणेबाबत

उपरोक्त नमूद विषयाच्या अनुषंगाने मा. मुख्य निवडणूक अधिकारी यांचे कडील पत्र क्रमांक ईएलआर-२०२५/प्र.क्र.८७/निवडणूक-६ दि. १२.०९.२०२५ अन्वये दिनांक ०१.११.२०२५ या अर्हता दिनांकावर आधारीत औरंगाबाद, पुणे व नागपूर विभागातील पदवीधर आणि अमरावती व पुणे विभागातील शिक्षक विधानपरिषद मतदारसंघासाठी नव्याने मतदारयाद्या तयार करण्याचा कार्यक्रम खालील प्रमाणे घोषीत केला आहे.

| अ.क्र. | पुनरिक्षण कार्यक्रमाचे टप्पे | कालावधी |
|---|---|---|
| १ | मतदार नोंदणी अधिनियम १९६० चे कलम ३१ (३) अन्वये जाहीर सूचना प्रसिध्द करण्याचा दिनांक | दि. ३० सप्टेंबर, २०२५ (मंगळवार) |
| २ | मतदार नोंदणी अधिनियम १९६० चे कलम ३१ (४) अन्वये वर्तमान पत्रातील नोटीसीची प्रथम पुनर्प्रसिध्दी | दि. १५ ऑक्टोबर, २०२५ (बुधवार) |
| ३ | मतदार नोंदणी अधिनियम १९६० चे कलम ३१ (४) अन्वये वर्तमानपत्रातील नोटीसीची द्वितीय पुर्नप्रसिध्दी | दि. २५ ऑक्टोबर, २०२५ (शनिवार) |
| ४ | प्रकरणपरत्वे नमूना १८ किंवा १९ द्वारे दावे व हरकती स्वीकारण्याचा अंतिम दिनांक | दि.०६ नोव्हेंबर, २०२५ (गुरुवार) |
| ५ | हस्तलिखिते तयार करणे व प्रारुप मतदार याद्यांची छपाई | दि. २० नोव्हेंबर, २०२५ (गुरुवार) |
| ६ | प्रारुप मतदार याद्यांची प्रसिध्दी | दि. २५ नोव्हेंबर, २०२५ (मंगळवार) |
| ७ | दावे व हरकती स्वीकारण्याचा कालावधी (मतदार नोंदणी अधिनियम १९६० चे कलम १२ अंतर्गत | दि. २५ नोव्हेंबर, २०२५ (मंगळवार) ते दि. १० डिसेंबर, २०२५ (बुधवार) |
| ८ | दावे व हरकती निकाली काढण्याचा दिनांक व पुरवणी यादी तयार करणे व छपाई करणे | दि. २५ डिसेंबर, २०२५ (गुरुवार) |
| ९ | मतदार यादीची अंतिम प्रसिध्दी | दि. ३० डिसेंबर, २०२५ (मंगळवार) |

पदवीधर व शिक्षक मतदार संघाच्या याद्या तयार करण्यासाठी आपले कार्यक्षेत्रासाठी आपली **विभागस्तरीय नोडल अधिकारी** म्हणून नियुक्त करणेत येत असून पुणे विभागातील सर्व पदवीधर व शिक्षक मतदारांची नोंदणी होणेचे अनुषंगाने आपले अधिनस्त सर्व यंत्रणांना / संस्थाना या मतदार नोंदणी कार्यक्रमाबाबत आपले स्तरावरून अवगत करणेत यावे.

सदर कार्यक्रमाचे अनुषंगाने मा. भारत निवडणूक आयोग व मा. मुख्य निवडणूक अधिकारी महाराष्ट्र राज्य यांनी दिलेल्या निर्देशांबाबत अवगत करणेसाठी मतदार नोंदणी अधिकारी, पुणे विभाग पदवीधर व शिक्षक मतदार संघ तथा विभागीय आयुक्त पुणे विभाग, पुणे यांचे अध्यक्षतेखाली दिनांक **१६.१०.२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता** झुंबर हॉल, विधानभवन पुणे येथे बैठक आयोजीत करणेत आलेली आहे. सदर बैठकीस आपण समक्ष उपस्थित रहावे.

**तसेच सदर बैठकीस आपले अधिनस्त जिल्हास्तरीय अधिकारी /शैक्षणिक संस्थांचे प्राचार्य यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात व तालुकास्तरीय अधिकारी /शैक्षणिक संस्थांचे प्राचार्य यांनी तहसिल कार्यालयात समक्ष व्ही.सी. व्दारे बैठकीला उपस्थित रहावे याबाबत आपले स्तरावरून संबंधीतांना कळविणेत यावे. बैठकीच्या ठिकाणाबाबत संबंधीत तालुक्याचे उपविभागीय अधकारी / तहसिलदार यांचेशी संपर्क साधणेत यावा.**

बैठकीसाठी सर्व निमंत्रित केलेल्या निमंत्रितांनी बैठकीच्या ठिकाणी **दिनांक १६.१०.२०२५ रोजी सकाळी १०.१५ वाजता** न चुकता उपस्थित राहणेचे असून बैठक सुरु होणेपुर्वीच हजेरीचा अहवाल सर्व जिल्ह्यांच्या उपजिल्हा निवडणूक अधिकारी यांचेमार्फत विभागीय आयुक्त कार्यालयास सादर करणेत येणार आहे.

**सदरची बैठक ही पदवीधर व शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी नव्याने मतदार नोंदणी करणेबाबतची महत्वाची बैठक असून सदर बैठकीस अनुपस्थित राहिल्यास निवडणूक /मतदार नोंदणी अधिनियमातील तरतुदीनुसार संबंधीतांविरुध्द कारवाई करणेत येईल याची नोंद घेणेत यावी.**

10.10.25

(डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार)
मतदार नोंदणी अधिकारी
पुणे विभाग पदवीधर व शिक्षक मतदार संघ, तथा
विभागीय आयुक्त, पुणे विभाग पुणे